तात्काळ,

(कायम विना अनुदानित)

20884/24

जा.क्र.शिउसं/प्राथ.-२/खाप्राशा/अ.सु/न.शा/पर.
1138 /६/नाविना/२००३-०४.
विभागिय शिक्षण उपसंचालक कार्यालय, ना.रोड.
नाशिक विभाग नाशिक.
दिनांक :- २४-७-२००३

प्रति,

अध्यक्ष/ट्रस्टी,
गोमामाता शिक्षण संस्था नंदुरबार
ता. जि. नंदुरबार

जावक लिपिक
शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग
यांचे कार्यालय, नाशिकरोड

विषय:- सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथ.शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत अग्रिम सुचना.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र.व्हीएलएस -९०३/

वरील विषयाचे संदर्भाधिन पत्रान्वये कळविण्यात येते की, शासनाचे २००३-०४ या शैक्षणिक वर्षी आपल्या संस्थेच्या मदर तेरेसा इंग्लिश मिडियम स्कूल नंदुरबार ता.जि. नंदुरबार इंग्रजी माध्यम ~~विना अनुदान~~ /कायम विनाअनुदान तत्वावर इ.१ली फक्त एक तुकडी नविन शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. शासन पत्रातील सर्व अटीची पुर्तता करित असल्यास नविन प्राथ. शाळा सुरु करण्यास परवानगी आदेश शासनाकडुन प्राप्त झालेले आहे, हे प्रथमतः कळविण्यात येत आहे.संबधित अधिकाऱ्यांचा संस्था परवानगी पत्रातील अटी पुर्ण करीत असल्या -बाबतचा पडताळणी रु. २० च्या स्टॅपपेपर वरील बंधपत्रावर संस्था कायम विनाअनुदान तत्वावर प्राथ.शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदाना ची मागणी करणार नाही असे हमीपत्रासह अहवाल संबधित शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. वा प्रशासनाधिकारी न.पा.शि.मंडळ यांचेकडुन प्राप्त झाल्यावर आपल्या प्रस्तावित शाळेस शासनाने दिलेली परवानगी कळविण्याची कार्यवाही होईल.

शिक्षण उपसंचालक
नाशिक विभाग. नाशिक करिता,

प्रत :- शिक्षणाधिकारी (प्राथ.)जिल्हा परिषद ---------- जि. ----------
प्रशासनाधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ-- नंदुरबार -------- जि. नंदुरबार

सदर शाळेस तातडीने भेट देऊन परवानगी पत्रातील अटी,शर्तीच्या पुर्ततेचा अहवाल,निवडणुक आचार संहिता, पिण्याच्या पाण्याची,मुला व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा,प्रस्तावित आणि परवानगी प्राप्त ठिकाणीच शाळा प्रत्यक्ष आहे काय? रु.२०चे मुद्रांकीत बंधपत्रावर संस्थेचे मूळ हमीपत्राच्या तीन प्रतीसह इत्यादी तपशिलासह तात्काळ सादर करावा.

नगरपालिका शिक्षण मंडळ नंदुरबार सर्व साधारण सभा दि २/२/२००५ ची लागु पुरती नक्कल.

विषय क्रमांक ५ :- म. आयत्यावेळी म. सभापती यांच्या परवानगीने आयत्यावेळी घेण्यांत येणारे विषयावर चर्चा करणे.

[१] जिजामाता शिक्षण संस्था नंदुरबार ता. जि. नंदुरबार संचलित मदर टेरेसा इंग्लीश मिडीयम स्कुल नंदुरबार या शाळेस कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देणे संबंधी.

---

ठराव क्रमांक १०५:-कार्यालयीन अहवालाची माहिती घेतली जिजामाता - शिक्षण संस्था संचलित मदर टेरेसा इंग्लीश मिडीयम स्कुल नंदुरबार यास शासनाचे पत्र क्रमांक व्हीएलएस/1003 /५०९/२००३ प्राशि-३ दिनांक २४/६/२००३ अन्वये - कायम विना अनुदान तत्वावर सन २००३-०४ पासुन परवानग दिली आहे. तसेच म. विभागीय शिक्षण उपसंचालक सो नाशिक विभाग नाशिक याचे कडील पत्र क्र शिउस/ प्राशि-/खाप्राशा/नाविशा/ ०३-०४/६/२००४ /०५ / १४१०/५७६/७७ दिनांक १/१/२००५ अन्वये सन २००३-०४ नुतनीकरण २००४-०५ पासुन नुतनीकरणासह कायम विना अनुदान तत्वावर इं.जी माध्यमाची शाळा सन २००४-०५ पासुन सुरु करण्यास मंजुरी दिलेली आहे. सदर शाळेस कायम विना अनुदान तत्वावर शाळा सुरु करण्यास सर्वानुमुते प्रथम मान्यता देण्यांत येत आहे. यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक:- म. श्री. एजाज अ. शे. ईस्माईल.

अनुमोदक:- म. श्री. रमेशचंद्र सुकलाल मोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/- x x x<br>प्रशासन अधिकारी<br>न. पा. शिक्षण मंडळ नंदुरबार

सही/- x x x<br>सभापती.<br>न. पा. शिक्षण मंडळ नंदुरबार.

---

//// खरी नक्कल ///

[signature]

प्रशासन अधिकारी

" कायम विना अनुदान तत्वावर शाळा" | जा. क्र/नपाशिमं/शाप्रशा/कावि३/२००
---|---
 | नगरपालिका शिक्षण मंडळ नंदुरबार
 | दिनांक २८/२/२००५. /1695/20

प्रति,

अध्यक्ष

जिजामाता शिक्षण संस्था,

नंदुरबार....

विषय:-जिजामाता शिक्षण संस्था नंदुरबार संचलित मदर टेरेसा इंग्लीश मिडीयम स्कुल नंदुरबार या शाळेस "कायम विना अनुदान -तत्वावर शाळा सुरु सुरु करण्यास प्रथम मान्यता देणे बाबत.

---

संदर्भ :- १] म. शिक्षण उपसंचालक ,नाशिक विभाग नाशि - क यांचे कडील पत्र क्र/शिउस/प्राशि/खाप्राशा नावि/शापर/६/०३/-०४/२००४-०५ [१४१०/५७६/७८ दिनांक १/१/२००५.

२] न.पा. शिक्षण मंडळ नंदुरबार सभा दि २/२/२००५ ठराव क्रमांक १०५ .

वरील विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, शासनाने आपल्या संस्थेस सन २००४-०५ पासुन इंग्रजी माध्यमाची इयत्ता १ ली चा वर्ग सुरु करण्या कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास दिलेल्या परवानगीय म. शिक्षण - उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांचे संदर्भ क्र १ अन्वये अंतीम परवानगी दिलेली आहे. त्यानुसार न.पा. शिक्षण मंडळ नंदुरबारने सर्व साधारण सभेत ठराव क्रमांक १०५ अन्वये कायम विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमि शाळा सुरु करण्यास प्रथम मान्यता दिलेली आहे. सोबत ठरावाची प्रत सुलभ संदर्भासाठी जोडली आहे.

१ ] आपल्या शाळेस नाम फलकावर कायम विना अनुदान तत्वावरील शाळा असे ठळकपणे नमुद करावे.

२] शाळा सोडल्याचे दाखले देतांना त्यावर कायम विना अनुदान तत्वावरील शाळा असे लाल शाईने अधोरेखित करावे.

३] शाळेत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती करतांना नियुक्तीसाठी जाहिरात देतांना व निवड करतांना तसेच नियुक्ती आदेश देतांना आदेशाव ठळकपणे "कायम विना अनुदान तत्वावरील शाळा " असे नमुद करावे.

[ प्रकाश जाधव]
प्रशासन अधिकारी
नगरपालिका शिक्षण मंडळ नंदुरबार

प्रत माहितीस्तव सविनय सादर.